# उर्दू शायरी जगणं शिकवते - अंबरीश मिश्र

प्रतिनिधी, पुणे

'चोरी करूँ तो हाथ काट दे मगर, पहेले खुदा ए वक्त मुझे रोजगार दे!' अशा एकेका शायरीतून उर्दूची नजाकत, गोडवा आणि प्रगल्भता ज्येष्ठ पत्रकार अंबरीश मिश्र यांनी शनिवारी उलगडली. ''उर्दू शायरीच्या दोन ओळीतून रोजच्या जगण्यातला अनुभव, तत्त्वज्ञान हे गाळून अगदी चपखलपणे पोहोचवले जाते,'' असे मत मिश्र यांनी या वेळी व्यक्त केले.



'आश्ना' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी झाले. या वेळी मंजिरी धामणकर, विवेक सावंत, अंबरीश मिश्र, देवयानी अभ्यंकर, सुप्रिया लिमये आदी उपस्थित होते.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनने आयोजित केलेल्या मंजिरी धामणकर लिखित 'आश्ना' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात मिश्र बोलत होते. या वेळी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. विवेक सावंत, धामणकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशनच्या देवयानी अभ्यंकर, बुकगंगा डॉट कॉमच्या सुप्रिया लिमये आदी उपस्थित होते. या वेळी 'आश्ना'चे ई-बुक आणि ब्रेल लिपीतील आवृत्तीचेही प्रकाशन करण्यात आले.